महाराष्ट्र शासन

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय,

रॉयल इन्शुरन्स इमारत, 5 वा मजला, 14 ज.टा. मार्ग, चर्चगेट, मुंबई

दूरध्वनी क्र : 022-22821419, 22852814 Email ID :dycor.ho-mum@gov.in

क्र.निशि/दुकान/९/२०२४/का.वि.५२३/प्र.क्र.२३/जा. २८८ दिनांक : २६/०९/२०२४

प्रति,
माहिती संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन,
१७ वा मजला, मंत्रालय समोर
मुंबई - ४०००३२

**विषय:- मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नवीन शिधावाटप दुकान उघडण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत.**

**संदर्भ:-** क्र.निशि/दुकान/९/२०२४/का.वि.५२३/प्र.क्र.२३/जा.२६१, दिनांक २८.०८.२०२४

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रासोबत मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नवीन अधिकृत शिधावाटप दुकान उघडण्यासाठी प्रसिध्द करण्यासाठी पाठविण्यात आलेली जाहिरात दिनांक ३०.०८.२०२४ रोजी नवराष्ट्र या मराठी भाषिक आणि नवभारत या हिंदी भाषिक दैनिक वृत्तपत्रांत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. (मुंबई आवृत्ती)

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज विक्री व स्विकृतीची मुदत वाढविण्यात येत असून त्याबाबतची नोटीस सोबत पाठविण्यात येत आहे. सदरहू नोटीस जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेल्या उपरोक्त वृत्तपत्रांत तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी व जाहिरातीच्या नमुन्यासहीत देयके या कार्यालयाकडे पाठवावीत.

दिनांक २९/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करावी.

**सोबत:नोटीस**

आपला विश्वासू

(सुधाकर तेलंग, भा.प्र.से.)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रत,
उप नियंत्रक शिधावाटप,
अ, ड, ई, ग, फ परिमंडळ,
मुंबई / ठाणे.

## मुंबई/ ठाणे शिधावाटप क्षेत्रात नवीन अधिकृत शिधावाटप दुकान (रेशन शॉप) उघडण्यासाठी जाहिरात

या कार्यालयामार्फत मुंबई/ ठाणे शिधावाटप क्षेत्रात संस्था/स्वयंसहाय्यता बचत गटासाठी ७७७ ठिकाणी अधिकृत शिधावाटप दुकाने मंजूरीसाठी दैनिक नवराष्ट्र या मराठी भाषिक आणि दैनिक नवभारत या हिंदी भाषिक वृत्तपत्रांत दिनांक ३०.०८.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज विक्री व स्विकृतीच्या मुदतीत दिनांक ०७.१०.२०२४ पर्यंत वाढ करण्यात येत आहे. सबब इच्छुक आवेदकांनी विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित परिमंडळ कार्यालयाकडून प्राप्त करुन आवश्यक त्या कागदपत्रासह परिमंडळ कार्यालयात उपरोक्त मुदतीत सादर करावीत.

सदर ७७७ बाब पैकी, शासनाकडे पुनरिक्षण अर्ज प्रलंबित असल्याने, शासन आदेशान्वये अधिकृत शिधावाटप दुकान स्थलांतर करण्याचे आदेश असल्याने तसेच न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने सदर विभागात नवीन दुकान मंजुरीसाठी आवश्यक एकांक नसल्याने, बाब क्रमांक निहाय एकूण ३६ अधिकृत शिधावाटप दुकानाचे प्रस्ताव जाहीरातीतून वगळण्यात आले असून याबाबतची माहिती परिमंडळ स्तरावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

इच्छुक संस्था/स्वयंसहाय्यता गट यांनी अधिक माहितीसाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर जाहिरातीस दिलेली मुदतवाढ **www.controllerofrationing-mumbai.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(सुधाकर तेलंग, भा.प्र.से.)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.